**महत्वाचे परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, लेखा विभाग,
क्र.लेखा/८/आपू/१२०/२०१४,
दिनांक : ०२ /०९ /२०१४

**विषय :- लेखापरिक्षण आक्षेपपूर्तता व अनुपालन बाबत..**
**संदर्भ :- १) मुलेप/०१/कावि/११०२/२०१४ दि. ११/०८/२०१४**
**२) लेखा/०८/कावि/आपू/११३/२०१३ दि. १२/१२/२०१३**
**३) लेखा/०८/कावि/आपू/२०३/२०१४ दि. ०७/०१/२०१४**
**४) मुलेप/०१/कावि/७२/२०१४ दि. १४/०७/२०१४**
**५) प्रशा/०१/कावि/१२००/२०१३ दि. ४/०९/२०१३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे आर्थिक वर्षानुसार लेखापरिक्षणाचे कामकाज लेखा परिक्षण विभागामार्फत करणेत येते उपरोक्त संदर्भ क्रमांक १ नुसार मुख्यलेखापरिक्षण विभागाने आत्तापर्यंत सन १९८२-१९८३ ते २००५-२००८ या कालावधीचे लेखा परिक्षण कामकाज पूर्ण केले असून सन २००८-२००९ ते २००९-२०१० चे लेखा परिक्षण सुरु करणेत आले असून दिनांक ३१/०७/२०१४ अखेर १९८२-१९८३ ते२००८-२०१० या कालावधीतील प्रंलबित आक्षेप, आक्षेपधिन व वसुलपात्र रकमांची एकत्रित विभागवार (Groupwise) माहिती संदर्भिय पत्रान्वये लेखाविभागाकडे पाठविण्यात आलेली आहे. ती सोबतच्या तक्त्यामध्ये जोडणेत आलेली आहे. मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी पाठविलेल्या दर महिन्याचा आक्षेपांचा तपशिल प्राप्त झाल्यानंतर तो सर्व विभागांना दर महिन्याला पाठविला जातो. उपरोक्त आक्षेपाची संख्या पाहता आक्षेपांची पूर्तता करणेकामी विभागप्रमुखांनी प्रयत्न केलेले दिसून येत नाही. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची असून याबाबत विभागप्रमुखांनी व्यक्तीशा पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

२/- उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ अन्वये दिनांक १६, १७, १८ व दिनांक - २०/०१/२०१४ रोजी मा. मुख्यलेखापाल व उपमुख्यलेखापाल यांचे समवेत संबधीत सर्व विभागांकडील कामकाज सोपविलेल्या उपलेखापाल, लेखापाल व लेखाधिकारी याचे समवेत प्रंलबित आक्षेपाचा आढावा घेऊन आक्षेप निरस्त करणेबाबत चर्चा करणेत आली होती. तरी देखील मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी पाठविलेला दि. ३१/०७/२०१४ अखेर आक्षेपांची संख्या फार मोठया प्रमाणावर असून, आक्षेप निरस्त करणेबाबत गांर्भीयाने लक्ष दिल्याचे दिसुन येत नाही. सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये मा. मुख्यलेखापरिक्षक व मा. मुख्यलेखापाल यांचे समवेत दिनांक १४/०७/२०१४ रोजी सर्व विभागप्रमुखांबरोबर आक्षेप पुर्तता करुन आक्षेप निरस्त करणेबाबत मिंटीग घेण्यात आली होती. तसेच मा. आयुक्त यांनी दि. ११/०८/२०१४ चे विभागप्रमुखांच्या मिटींगमध्ये प्रलंबित आक्षेपांची संख्या जास्त असल्याने विभागप्रमुखांनी संबंधित लेखाधिकारी / लेखापाल / उपलेखापाल / संबंधित कर्मचारी यांचेकडून प्रलंबित

आक्षेपांची त्वरीत पूर्तता करुन आक्षेप निरस्त करणेची कार्यवाही करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

२/- संदर्भिय क्रमांक ५ यांचे कडील आदेशान्वये संबधित विभागाकडील उपलेखापाल, लेखापाल, व लेखाधिकारी यांनी विभागाशी संबधित आक्षेपांची पूर्तता करुन आक्षेप निरस्त करणे बाबत आदेश देणेत आलेले आहे. त्यास अनुसरुन विभाग प्रमुखांनी संबधित उपलेखापाल, लेखापाल, व लेखाधिकारी संबंधित कर्मचारी यांना रोजच्या रोज काही वेळ आक्षेप पुर्तता कामी नियोजन करुन आदेश निर्गमित करावे व रोज आढावा घेऊन मुलेपकडील, महालेखाकार यांचे कडील तसेच स्थानिक निधी यांचेकडील प्राप्त झालेल्या आक्षेपांची वेळोवेळी पुर्तता करुन लेखा विभागाकडे दर आठवडयाचे सोमवारी अहवाल सादर करावा.

याबाबत आक्षेपांची पुर्तता ३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत करणेत यावी यासाठी संबधित विभागाप्रमुख व संबधित कर्मचारी, उपलेखापाल, लेखापाल, व लेखाधिकारी यांनी आक्षेपांची पूर्तता तसेच वसूलपात्र रक्कमा वसूल करणेबाबत व आक्षेपाधिक रकमांचे रेकॉर्ड उपलब्ध करुन देणेबाबत प्राध्यानांने प्रयत्न करावे अन्यथा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणेत येईल.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

प्रत,
सर्व संबधित विभाग प्रमुख

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

मा. मुख्यलेखापारिक्षण यांचे कडील गोषवारा क्रमांक:-

मुलेप/१/कावि/९१७/२०१४ दिनांक ९/७/२०१४ अन्वये विभाग निहाय दि.३०/६/२०१४ अखेर

सन १९८२-८३ ते सन २००८-१० या कालावधीतील प्रलंबित आक्षेप, आक्षेपाधीन व वसूलपात्र रक्कमे

संदर्भात एकत्रीत गोषवारा

मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/११२६/२०१३ दि. १७/०८/२०१३

| अ.क्र. | विभागाचे नाव | एकूण प्रलंबित आक्षेप संख्या | एकूण प्रलंबित आक्षेपाधीन रक्कम | एकुण प्रलंबित वसूलपात्र रक्कम | रेकॉर्ड उपलब्ध न झालेले प्रलंबित रक्कम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग विभाग | ७५२ | ९,५८१,९२९ | १,९७४,२२६ | ८,४३८,९१२ | |
| २ | ब प्रभाग विभाग | २८६ | ५,९५०,०८७ | ३,५५५,००७ | १२,५३२,३१६ | |
| ३ | क प्रभाग विभाग | ५१६ | ८,७३४,०७४ | ४,६४९,८१७ | १००,५०८,३७६ | |
| ४ | ड प्रभाग विभाग | ४८७ | ४,३९३,८३४ | १,३७७,६२९ | ४४,२८२,७७१ | |
| ५ | स्थापत्य मुख्य कार्यालय | ९७९० | ४७४,७५३,४७५ | २८,०१६,०४९ | २,६७९,३४६,४५० | |
| ६ | आरोग्य मुख्य कार्यालय | २९० | ५३,३६७,०२१ | २७,४९,२२५ | ७६,१७२,३३५ | |
| ७ | नागरवस्ती विकास योजना | ३७ | ३,४७९,२२४ | १,६३५,६७७ | ५,७९४,४८९ | |
| ८ | कायदा विभाग | ८५ | १,२२४,९६८ | १२१,३६४ | ३२६,४९५ | |
| ९ | उद्योगधंदा परवाना विभाग | ४८२ | ६९,०२२,५११ | ८,५७३,६९९ | १०,००० | |
| १० | नगरसचिव विभाग | ० | ० | ० | ० | |
| ११ | अतिक्रमण विभाग | ३२० | ४९४,८२९ | ४,६७८,९८० | १४७,६५६ | |
| १२ | क्रिडा विभाग | २१४ | २७७,००२ | १०५,०६३ | २,३१५,८६७ | |
| १३ | शिक्षण समिती विभाग (मा.शिक्षण) | ७४४ | ४,८०१,४२४ | ९५७,००३ | २,३०५,३०७ | |
| १४ | प्रशासन विभाग | १९ | ६,७९७,७४६ | ० | २९,९४४ | |
| १५ | संगणक विभाग(ई गव्हर्नर) | ८६ | २,२६३,२६२ | १,२३८,५७४ | ५९,४५५,२१० | |
| १६ | निवडणूक विभाग | १३ | ४२,२८५ | २,५४७ | ० | |
| १७ | चिंचवड प्रेक्षागृह (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) | ३० | २६,८२५ | ३५,२२५ | ६९१,५०२ | |
| १८ | आचार्य अत्रे रेगमंदिर | ९ | १००,९३५ | ९०० | ० | |
| १९ | वैद्यकीय मुख्य कार्यालय | २१२१ | ५९,४५०,०७३ | ९,९१३,३५३ | ११२,३५०,२९९ | |
| २० | भुमी आणि जिंदगी | ३१० | ४३२,३८९ | २१,१७५,७८३ | ० | |
| २१ | लेखा विभाग | ११५३ | १४६,१२६,८१० | २८,८२०,८१९ | २४०,६९५,४९५ | |
| २२ | बांधकाम परवानगी | २२८ | ८,८०२,२७६ | २२,२८८,२०३ | ४३,४३४,३८६ | |
| २३ | झो. नि. पु. विभाग | २५२ | १४,५७६,१९५ | १५६,८२१,४४६ | १६,२०८,७८७ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | झो.नि.पु. स्थापत्य (अस्थापना) | २५ | ६,१८०,०४५ | ८,३४९ | १८,८०१,६७२ | |
| २५ | उद्यान विभाग | ३०६ | २५,१९६,९५८ | १६१,०७९ | २०,५७३,७८० | |
| २६ | मध्यवर्ती भांडार विभाग | २९ | ४,२४५,७७७ | १६१,४०८ | १४,०४६,१९७ | |
| २७ | जनता संपर्क विभाग | ६५ | १,०१३,०८७ | ३६,५८२ | २,३४१,५४५ | |
| २८ | नगररचना विभाग | २२५ | ३१२,७८४,७६८ | ६०,२६८,५४८ | १८,१२५,७८८ | |
| २९ | अग्नीशामक विभाग | २२१ | १,३२६,४१४ | १,५७५,८४५ | ४०७,९५६ | |
| ३० | कार्यशाळा विभाग | १४६ | ४,६३३,१४७ | ८६०,९०४ | ७,५५३ | |
| ३१ | सुरक्षा विभाग | २४ | २,३४४,०७३ | ४२,७३८ | ० | |
| ३२ | करसंकलन मुख्य कार्यालय | ५६३८ | २१,०४१,८९८ | ७३,४३१,८३३ | २१०,६९१,२०० | |
| ३३ | सार्वजनिक वाचनालय | १.२३६ | १,४११,९०४ | १,८४३,२४३ | ९९८,१३७ | |
| ३४ | विद्युत मुख्य कार्यालय | १७०३ | ६९,२५७,२०४ | ७,४६१,१४१ | ५७७,३४१,२६४ | |
| ३५ | इंदिरा गांधी उद्यान (विद्युत विभाग) | ४१ | ७७२,८७२ | १,११९,६०५ | ० | |
| ३६ | दुरध्वनी विभाग (दुरसंचार) | १२ | १९० | ४६० | ० | |
| ३७ | पाणीपुरवठा मुख्य कार्यालय | १८९४ | ६७,६७१,०२७ | ३,८८७,११७ | ६४६,७१४,४९९ | |
| ३८ | स्थनिक संस्था कर विभाग | १०९७ | ७८,९२१,८१५ | १७,७६२,५२६ | २७,६६६,५८४ | |
| ३९ | कामगार कल्याण विभाग | ३७ | २,१२५,१८७ | ११३,३८० | १३०,७०२ | |
| ४० | अभिलेख कक्ष | २ | ० | ० | ० | |
| ४१ | जनगणना विभाग | ० | ० | ० | ० | |
| ४२ | नागरी सुविधा केंद्र | ३ | ८३० | १,१०१ | ० | |
| | **एकूण** | **३०९२५** | **१,४७३,६२५,५४०** | **४६७,४२५,३४७** | **४,९४२,८९३,४७४** | |

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.